शेतकरी मासिकाच्या छपाईसाठी ई-निविदा प्रक्रिया तसेच दर निश्चित करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र.शेमाछ-२०१८/प्र.क्र.०१/११-अे,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ मे, २०१८

<u>वाचा</u> :

१) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र. शेमाछ-२०१६/प्र.क्र.२९०/११-अे, दि.२३.०३.२०१७
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. पदसातत्य -२०१८/प्र.क्र.२५/११-अे, दि.१२.०३.२०१८
३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृआ/शमासे/शे.अंक छ.मं/२७७/१८, दि.२५.०३.२०१८
४) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/ अर्थ-३, दि.०२.०४.२०१८

<u>प्रस्तावना</u> :

शेतकऱ्यांच्या हितार्थ सन १९६५ पासून प्रकाशित करण्यात येणाऱ्या शेतकरी मासिकाच्या माध्यमातून कृषि क्षेत्रातील लक्षवेधक तसेच अद्ययावत घडामोडींची माहिती राज्यातील व राज्याबाहेरील शेतकऱ्यांना पोहचविण्यात येते. सन २०१८-१९ या वर्षासाठी शेतकरी मासिकाच्या छपाईसाठी आयुक्त (कृषि) यांनी पार पाडलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये आनंद पब्लिकेशन, जळगाव यांनी नमूद केलेले दर न्यूनतम असल्यामुळे शेतकरी मासिक अंकाच्या छपाईचे काम आनंद पब्लिकेशन, जळगाव यांचेकडे सुपूर्द करण्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव कृषि आयूक्तालयाच्या दि.२५.०३.२०१८ रोजीच्या पत्राने शासनास सादर करण्यात आलेला आहे. कृषि आयुक्तालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शेतकरी मासिकाच्या निविदा प्रक्रियेस मान्यता देणे, सदर निविदा प्रक्रियेनुसार पात्र निविदाधारकांना अनुज्ञेय रकमांचे प्रदान करणे आणि अंकाच्या टपाल बटवड्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :

आयुक्त (कृषि) यांच्या दि.२५.०३.२०१८ च्या पत्राने प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर साकल्याने विचार करुन शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शेतकरी मासिकाच्या छपाईसंदर्भात प्रस्तुत आदेश निर्गमित झाल्यापासून एक वर्षाकरीता म्हणजेच एप्रिल, २०१८ ते मार्च, २०१९ या कालावधीकरीता आयुक्त (कृषि) यांनी त्यांचे स्तरावर केलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील न्यूनतम निविदाधारक आनंद पब्लिकेशन, जळगाव यांना शेतकरी मासिकाच्या छपाईचे काम देण्याच्या कार्यवाहीसह, लेखांचे संपादन / सुलभीकरण, लेखांची मांडणी-सजावट, मासिकाच्या चाररंगी छपाई याबाबच्या निविदांना त्याचप्रमाणे अंकाच्या टपाल बटवड्याकरीता येणाऱ्या टपालखर्चास खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	प्रतींची संख्या	मुखपृष्ठ १३० जीएसएम आर्ट पेपर व आतील ५६ व १०४ पानांसाठी ६० जीएसएम पेपर (प्रती अंक दर रू.)			
		मॅफलिथो पेपरसाठी		न्यूजग्लेज पेपरसाठी	
		५६ पानांसाठी	१०४ पानांसाठी	५६ पानांसाठी	१०४ पानांसाठी
१	१००,००० प्रती पर्यत	१६.४५	३३.४०	१६.९५	३३.८०
२	१००,००१, ते १५०,००० प्रती पर्यत	१६.४०	३३.३०	१६.८५	३३.७०
३	१५०,००१ ते २००,००० प्रती पर्यत	१६.२५	३३.२०	१६.७५	३३.६०
४	२००,००१ ते २५०,००० प्रती पर्यत	१६.१५	३३.१०	१६.६५	३३.५०
५	२५०,००१ ते ३००,००० प्रती पर्यत	१६.०५	३३.००	१६.५५	३३.४०
६	३००,००१ व त्यापुढे	१५.९५	३२.९०	१६.४५	३३.३०
	अधिक जीएसटी (टक्के)	१२.००	१२.००	१२.००	१२.००

२. शेतकरी मासिकाच्या अंक छपाईबाबत प्रस्तुत निर्णयानुसार निविदाधारकांशी आवश्यक तो करारनामा करण्यास आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. करारनामा केल्यानंतर त्याची एक प्रत शासनास पाठविण्यात यावी.

३. यावरील खर्च "मागणी क्र.डी-३, २४०१-पीक संवर्धन, १०९-विस्तार व प्रशिक्षण, १०९-विस्तार व शेतकरी प्रशिक्षण, (०१) माहिती व प्रचार (०१) (०२) शेतकरी मासिक, (२४०१ ०७४४) योजनेत्तर" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षाकरिता मंजूर केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि. ०२.०४.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१९१७१०२०७८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Arun Vishnupant Joshi

Digitally signed by Arun Vishnupant Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=25b1cd893dfd4dc594def1c4642465ecdafbdae899f879d9b4603fe37cfb3598, cn=Arun Vishnupant Joshi
Date: 2018.05.19 17:11:55 +05'30'

(अ.वि.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. कृषि संचालक (वि. व प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. कृषि उपसंचालक तथा संपादक, शेतकरी मासिक, कृषि आयुक्तालय, पुणे.
५. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परिक्षा), मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परिक्षा), नागपूर
८. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
९. संचालक, लेखा व कोषागार, मुंबई.
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मंुबई-३२
१३.संचालक, शासन लेखन,मुद्रण सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४
१४.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, पुणे
१५.वित्त विभाग (व्यय-१/विनियम/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई-३२.
१६.उप सचिव (कार्या.११-अे/२-अे) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.आनंद पब्लिकेशन, पोस्ट बॉक्स ने.१४०,१०६, मुसळी फाटा, धुळे रोड, राष्ट्रीय महामार्ग क्र.६, ता.धरणगाव, जि.जळगाव
१८. कक्ष अधिकारी, २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१९.निवडनस्ती, कार्यासन-११अे.